जा.क्र./OW.No.178 /पोउआ/प्रकटीकरण /2022
**पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय.**
Office of the
DY.Commissioner of Police (Detection),
Crime Branch, Mumbai.
**दूरध्वनी क्र.** /Tel. No. 2262 1220
**दिनांक**/Date : 02 /02/2022

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई

विषय :– Best Detection of the Month December – 2021 ''उत्कृष्ट गुन्हे शोध'' व Best Conviction of the Month December – 2021 ''उत्कृष्ट अपराधसिध्दी'' पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन/बेस्ट रिकव्हरी ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

माहे डिसेंबर–२०२१ करीता '' **बेस्ट डिटेक्शन अर्थात ( उत्कृष्ट गुन्हे शोध ) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात ( उत्कृष्ट अपराधसिध्दी)** '' याकरीताचे खालील नमुद पोलीस ठाणे याची निवड करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ) माहे डिसेंबर – २०२१ करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ –**

१) गु.प्र.शा., गु.अ.वि, कक्ष–३, गुन्हे शाखा, मुंबई, गु.र.क्र. ४३९/२१ कलम ३०२,३२८,३६३ भादवि, ( काळाचौकी पोलीस ठाणे, मुंबई )

२) गु.प्र.शा., गु.अ.वि.,कक्ष–१०,गुन्हे शाखा, मुंबई, गु.र.क्र.२५१/२०१४ कलम ३०२, ४५२, ३९४,३४२ भादंवि( पवई पोलीस ठाणे, मुंबई )

३) एम.एच.बी., पोलीस ठाणे, परिमंडळ –११, गु.र.क्र ७९८/२०२१ कलम ३०२, ३९७, ५०६(२), ३४ भादंवी सह कलम ३,२५ शस्त्र अधिनियम

**ब) माहे डिसेंबर – २०२१ करीताचे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ –**

१) काळा चौकी पोलीस ठाणे, परिमंडळ–०४, गु.र.क्र. २१३/२०१५, कलम ३०२ भा.द.वि. सह ३७(१)(अ) सह १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा
२) शिवाजी नगर पोलीस ठाणे, परिमंडळ – ०६, गु.र.क्र. ५७२/२०१५, कलम ३७७ भा.दं.वि. सह ४, १२ पोक्सो अधिनियम, २०१२
३) आझाद मैदान पोलीस ठाणे, परिमंडळ – ०१, गु.र.क्र. ०३/१६, कलम ३०२,३२५,३४ भादवि
४) दिंडोशी पोलीस ठाणे, परिमंडळ – १२, गु.र.क्र. ४९७/२०१४ कलम ३०२, ३२४, ३२३, ५०६(२), १४३, १४४, १४७, १४८, १४९, २०१ भा.दं.वि. सह ४, २७ भा.ह.का

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ) बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

प्रत:–
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

**मजकुर :—**

दिनांक ०१/०२/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आदेशाने “ **Best Detection of the Month** ”माहे डिसेंबर—२०२१ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ डिसेंबर—२०२१

| | | |
|---|---|---|
| ०१ | गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष—३, मुंबई. | गु.र.क्र.४३९/२०२१ कलम ३०२,३२८,३६३,३४ भा.द.वि. (काळाचौकी पोलीस ठाणे, मुंबई) |

**—: “ लहान मुलीचा निर्घुन खुन ”:—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमुद गुन्हयात फिर्यादी महिला दिनांक ३०/११/२०२१ रोजी १२.१५ ते १२.५५ वा. चे दरम्यान घरामध्ये एकटयाच असताना तसेच त्यांची ३ महिने वयाची मुलगी कॉटवर झोपलेली होती. त्यावेळी अंदाजे ३० ते ३५ वर्षे वया.ची अनोळखी महिला जुन्या मोबाईलच्या बदल्यामध्ये कपडे ठेवण्यासाठी बास्केट विकण्यासाठी आली असता फिर्यादीने त्यांचेकडे असलेले जुने मोबाईल देवुन प्लॅस्टीकची बास्केट घेणेसाठी घरातील जुने मोबाईल आणण्यासाठी आतल्या रुममध्ये गेली. त्यावेळी अनोळखी महिलेने फिर्यादीचे पाठीमागे जावुन फिर्यादीचे नाकाला गुंगी आणणारे औषध लावुन त्यांना बेशुध्द करुन कॉटवर ठेवलेली ३ महिने १५ दिवसाचे बाळाला अपहरण करुन घेवुन गेली म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | सौ. सपना बजरंग मगदुम वय ३२ वर्षे |
| बळीत | :— | ३ महिन्याची मुलगी |
| आरोपी अटक व दिनांक | :— | सौ. सपना बजरंग मगदुम वय ३२ वर्षे, (फिर्यादी) अटक दिनांक दि.०२/१२/२१ रोजी |

**तपास कौशल्य :—** सदर गुन्हयाचा समांतर तपास गु.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष—३, मुंबई कडुन मा. वरि ठांचे आदेशाने सुरु करण्यात आला होता. स.पो.नि. प्रकाश लिंगे व पोलीस पथक यांनी नमुद गुन्हयाचा तपास सुरु करुन परिसरातील सर्व सी.सी.टि.व्ही. फुटेज तपासणी सुरु केली. यातील फिर्यादी व त्यांचे पती यांना सध्याकाळी काळाचौकी पोलीस ठाणे येथुन सोडल्यानंतर नमुद पथकाने त्यांचे राहते घरी जावुन त्यांना विश्वासात घेवुन घडलेल्या हकीकतीबाबत माहिती घेतली असता यातील फिर्यादी यांनी माहिती दिली की, दिनांक ३०/११/२०२१ रोजी सकाळी १०.३० वा. चे दरम्यान अंदाजे ५० वर्षे वयाची महिला येवुन तिने जुन्या मोबाईलच्या बदल्यामध्ये तिच्याकडे असलेले बास्केट व भांडी देत असल्याचे सांगितले. त्यावेळी फिर्यादी यांनी नमुद महिलेस लहान मुलांचे कपडे ठेवण्यासाठी बास्केट बाबत विचारणा केली असता नमुद महिलेने सध्या तिच्याकडे तशा प्रकारचे बास्केट नसल्याचे सांगुन ती निघुन गेली.

त्यानंतर ११.३० चे सुमारास फिर्यादी यांचे पती त्यांचे मोठया मुलीस घेवुन तिचे सासु—सासरे असलेल्या दुसऱ्या रुमवर गेले व फिर्यादी यांचे आई—वडील हे कामानिमित्त इमारतीखाली गेले असता, १२.१५ वाजताचे सुमारास अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयाची अनोळखी महिला जुन्या मोबाईलच्या बदल्यामध्ये कपडे ठेवण्यासाठी बास्केट विकण्यासाठी घेवुन आली व तिने फिर्यादी यांना सकाळी आलेली महिला हि तिची सासु असल्याचे सांगुन सासुने फिर्यादी यांना बास्केटची आवश्यकता असल्याने बास्केट घेवुन पाठविले असल्याचे सांगितले. वर नमुद वेळी फिर्यादी या घरातील जुने मोबाईल आणण्यासाठी पाठमोरी झाली असता, त्यावेळी ३० ते ३५ वर्षाचे अनोळखी महिलेने फिर्यादीचे पाठीमागुन फिर्यादीचे नाकाला गुंगी आणणारे औषध लावुन त्यांना बेशुध्द करुन कॉटवर ठेवलेली ३ महिने १५ दिवसाचे बाळाला अपहृत करुन घेवुन गेल्याबाबतची हकीकत सांगितली.

त्यावेळी फिर्यादी यांचेकडे सदर घटनाक्रमाचे प्रात्याक्षित करुन घेतले असता फिर्यादी यांचे सांगणे व प्रात्यक्षित यामध्ये विसंगती असल्याचे आढळुन आले. तसेच फिर्यादी व फिर्यादी यांची आई यांचेकडे केलेल्या तपासात विसंगती आढळुन आली होती. मात्र सदरचे प्रकरण हे अतिशय गंभीर, संवेदनशील व समाजात भितीचे वातावरण निर्माण करणारे असल्याने तसेच मिडीयामध्ये सदर प्रकरणाची मोठी चर्चा झाल्याने पुराव्याशिवाय फिर्यादी यांची उलट तपासणी करणे योग्य नसल्याने फिर्यादी व त्यांचे कुटुंबिय यांचेवर गुप्त पाळत ठेवण्यात आली व इतर तपास चालू ठेवण्यात आला.

दिनांक ३०/११/२०२१ ते दिनांक ०२/१२/२०२१ रोजीचे केलेल्या तपासामध्ये परिसरातील सर्व सी.सी.टि.व्ही. फुटेज तपासले असता सकाळी १०.३० वा आलेली अंदाजे ५० वर्षे वयाची महिला हि सी.सी.टि.व्ही. फुटेजमध्ये दरम्यानच्या कालावधीत येताना व जाताना दिसत आहे. मात्र, फिर्यादी यांनी

संशय व्यक्त केलेली ३० ते ३५ वर्षे वयाची संशयीत महिला हि फिर्यादी यांनी तपासामध्ये सांगितलेल्या वेळेत आल्याचे अथवा गेल्याचे कोणत्याही कॅमेऱ्यामध्ये दिसुन आले नाही. तसेच सदर परिसरातून गुन्हयाच्या वेळेत बाहेर गेलेली चार चाकी वाहनांची सी.सी.टि.व्ही. च्या आधारे तपासणी केली असता संशयीत महिला गेली असल्याचे आढळुन आले नाही. गुप्त बातमीदारांकडुन देखील माहिती प्राप्त करण्यात आली परंतू त्यांचेकडुन देखील कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने फिर्यादी यांचेवर संशय बळावला.

त्यामुळे दिनांक ०२/१२/२०२१ रोजी सकाळी ०६.०० वाजता नमुद पथक फिर्यादी व तिचे पतीस तपासकामी कक्ष कार्यालय येथे आणणेकामी गेले असता फिर्यादी व तिचे पतीस काळाचौकी पोलीस ठाणे येथे तपासाकरीता नेले असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर ०९.०० वाजताचे सुमारास त्यांना काळाचौकी पोलीस ठाणे येथुन तपास करुन सोडले असल्याचे व ते राहते घरी आले असल्याचे माहिती मिळाल्याने त्यांना पुढील तपासकामी कक्ष—३ कार्यालयात आणण्यात आले.

यातील बळीत मुलीचे वडील श्री. बजरंग मगदुम यांचेकडे तपास केला असता ते कोणतीही माहिती देत नसल्याने त्यांना त्यांची पुर्ण पार्श्वभुमी विचारली असता त्यांना मुलगाच हवा होता असा हट्हास नसल्याचे व बळीत मुलगी झाल्यापासुन सर्व कुटुंब आनंदी असल्याचे सांगितले. त्यानंतर बळीत मुलीची आई, फिर्यादी नामे सौ. सपना बजरंग मगदुम वय ३२ वर्षे यांचेकडे तपास करीत असताना त्यांना विश्वासात घेवुन त्यांची पुर्ण पार्श्वभुमी विचारली असता त्यांना मुलगा होत नाही म्हणुन सर्व कुटुंबिय सतत दु  णे देत असल्याचे सांगितले व यापुर्वी तीन वेळा तिचा गर्भपात केला असल्याचे सांगितले. सदर बळीत मुलीचे वेळेस गर्भधारणा झाली असता, मुलगाच व्हावा याकरीता गावाकडील वैदयाकडुन औषध घेतल्याचे सांगितले. तिची प्रसुतीची तारीख हि दिनांक २३/०८/२०२१ अशी दिली होती. मात्र मुलगाच होणार ही सर्वाना खात्री असल्याने व तिचे पती बजरंग मगदुम यांचा वाढदिवस १५ ऑगस्ट रोजी असल्याने त्या दिवशी शस्त्रक्रिया करुन प्रसुती केल्याचे सांगितले. मात्र, नमुदचे अपत्य हे मुलगी झाल्याने तेव्हापासुन घरातील सर्व लोक नाराज होवुन मानसिक त्रास देत असल्याचे सांगितले. फिर्यादी व तिचे पती यांचेकडे केलेल्या तपासामध्ये विसंगती येत असल्याने फिर्यादी यांचेकडे कसुन तपास केला तरीही, तिने बळीत मुलीबाबत कोणतीही माहिती दिली नाही.

काळाचौकी पोलीस ठाणे कडुन फिर्यादी यांना गुंगीकारक औषध तोंडाला लावेले किंवा कसे? याबाबत माहिती घेणेकरीता फिर्यादी यांचे तोंडाचा स्वॅब घेवुन तपासणी करीता रासायनिक प्रयोगशाळेत पाठवला असल्याची माहिती मिळाली होती. त्या अनुषंगाने त्यांचेकडे तपास करता फिर्यादी गांगारुन गेल्या, त्यावेळी तिच्याकडे केलेल्या कौशल्यपुर्ण तपासामध्ये तिने पुन्हा मुलगीच झाल्याने तिचा कुटंबियांकडुन मुलासाठी पुन्हा मानसिक छळ सुरु झाला. या सर्व छळाला कंटाळुन फिर्यादीने दिनांक ३०/११/२०२१ रोजी वेळ १२.१५ वाजताचे सुमारास बळीत मुलीस जिवंतपणे घरातील पाण्याच्या टाकीत टाकुन तिच्या खुन केला असल्याबाबतची माहिती दिल्याने सदरबाबत खात्री करुन पुढील कार्यवाहीसाठी आरोपी महिलेस काळाचौकी पोलीस ठाणेच्या ताब्यात देण्यात आले.

सदर गुन्हा अत्यंत क्लीष्ट, संवेदनशील, सामाजिक दृष्टया अतिशय गंभीर व बहुचर्चित गुन्हयाचा गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि., कक्ष—३, मुंबई येथील तपास पथकाने केवळ ४८ तासात गुन्हा उघडकीस आणला.

**गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष—३, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | सहा. पोलीस आयुक्त, प्रकटीकरण—मध्य, | श्री. नितीन रामचंद्र अलकनुरे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | प्रभारी पोलीस निरीक्षक | श्री. सोपान हरिभाऊ काकड | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री. प्रकाश लक्ष्मण लिंगे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक | सिध्देश दिलीप जोष्टे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ना.क्र.९७१०८७ | रविंद्र मारूती देवार्डे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ना.क्र.०६.१९३४ | भास्कर भिमराव गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ना.क्र.०३.७५१ | वैभव जनार्दन गिरकर | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.शि.क्र.११३६०० | गोविंद भुजंगराव पानखडे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | म.पो. ना.क्र ०९.११८४ | मंजली चैतन्य फडतरे | प्रशस्तीपत्रक |

| ०२ | गु.प्र.शा. गु.अ. वि,कक्ष–१०, मुंबई. | गु.र.क्र.२५१/२०१४, कलम ३०२,४५२,३९४,३४२ भा दंविसं.. (पवई पोलीस ठाणे, मुंबई) |
|---|---|---|

## –: '' _जबरीचोरीसह खुन_ '':–

**<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u> :–** नमुद गुन्हयात दिनांक: १३/०६/२०१४ रोजी पवई पोलीस ठाणेस तक्रार प्राप्त झाली की, रूम नं. ०३, गणपत चाळ, के.बी.एम. कंम्पाऊंड, मिलेटरी रोड, अंधेरी पुर्व, मुंबई. हया घराचा दरवाजा बाहेरून कुलूप बंद असुन नमुद रूमच्या आत मधून दुर्गंधी येत आहे. पवई पोलीस घटनास्थळी पोहचले असता वृध्द महिला नामे शशीकला मारोती वाघमारे, वय ७५ वर्षे, हिचा मृतदेह कुजलेल्या व उताण्या स्थितीत होता व तिची जीभ बाहेर आलेली दिसत होती. तसेच नमुद वृध्द महिलेच्या अंगावरील सोन्याचे दागीने (१) अंदाजे ३ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन, त्यामध्ये १ ग्रॅम वजनाचे ओम डिझाईनचे सोन्याचे पेंन्डल. (२) अंदाजे ३ ग्रॅम वजनाचे कानातील सोन्याच्या रिंगा किं. अं. २०,०००/– चोरीस गेल्याचे दिसुन आले पवई पोलीस ठाणेस प्राप्त शविच्छेदन अहवाल व केलेल्या तपासावरून नमुद वृध्द महिलेच्या अंगावरील दागीने जबरी चोरी करून तिचा गळा दाबुन 'खुन' केल्याचे निष्पन्न झाले वरून पवई पोलीस ठाणे, गुरक्र. २५१/२०१४ कलम ३०२, ४५२, ३९४, ३४२ भादंविसं. अन्वये नोंद करण्यात आला

तसेच पवई पो.ठाणेकडून सदर गुन्हयाचा सतत दोन वर्ष तपास करून आरोपीताचा शोध न लागल्याने नमुद गुन्हा ''अ'' वर्गिकरण समरी करण्यात आला होता

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :– | श्री. दत्ताराम मारोती वाघमारे, वय ५५ वर्षे, |
| बळीत | :– | शशीकला मारोती वाघमारे, वय ७५ वर्षे |
| चोरीस गेलेली मालमत्ता | :– | (१) अंदाजे ३ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन, त्यामध्ये १ ग्रॅम वजना ओम डिझाईनचे सोन्याचे पेंन्डल.<br>(२) अंदाजे ३ ग्रॅम वजनाचे कानातील सोन्याच्या रिंगा किं.अ २०,०००/– |
| हस्तगत मालमत्ता | :– | – |
| आरोपी अटक व दिनांक | :– | प्रदिप तुकाराम सोनावणे, वय ३८ वर्षे<br>अटक दिनांक दि.०३/१२/२१ रोजी |

**<u>तपास कौशल्य :–</u>** नमुद गुन्हा ०७ वर्षो पासुन अउघड असल्याने मे २०२१ मध्ये प्रभारी पो. निरीक्षक, महेशकुमार ठाकूर यांनी सदर गुन्हयाचा नव्याने तपास करायचे ठरवले त्यासाठी त्यांनी सपोनि चौधरी, सपोनि तोडकर, पोह धारगळकर, पोह शेटे, पोना नलावडे यांचे पथक स्थापन केले. सदर पथकाने नमुद गुन्हयाचा तपास नव्याने सुरू केला पथकाने गुन्हयाच्या घटनास्थळी वारंवार भेट देवून आजुबाजूच्या परिसरातील स्थानिक लोकांकडे कसुन चौकशी केली. तसेच मयताचे सर्व नातेवाईक यांच्याकडे गुन्हयांच्या अनुषंगाने कौशल्यापुर्वक चौकशी केली असता मयत वृध्द महिलेचा नातु गुन्हा घडल्यापासुन गायब होता त्याचे नाव प्रदिप तुकाराम सोनावणे असे असल्याचे समजले. गुन्हयाचा तपास करणारे तत्कालीन तपासी अधिकारी पो.नि घावटे यांचेशी संपर्क साधुन गुन्हा व गुन्हयाबाबत जास्तीत जास्त माहिती प्राप्त केली. प्रदिप तुकाराम सोनावणे, याचे बाबत मित्र परिवार नातेवाईक यांचेकडून माहिती घेण्याचा प्रयत्न करण्यात आला परंतु तो कोणाच्याही संपर्कात नसल्याने त्याचेबाबत काहीही माहिती मिळून येत नव्हती. त्यामुळे प्रदिप तुकाराम सोनावणे याचेवर पोलीस पथकाचा संशय बळावला. प्रदिप तुकाराम सोनावणे याचे विषयी माहिती मिळवली असता त्याचे दोन लग्न झाल्याची माहिती समोर आली. दुसऱ्या पत्नीशी संपर्क साधुन अधिक माहिती घेतली असता दुसऱ्या लग्नावरून मयत आजी व नातु प्रदिप सोनावणे याचेमध्ये वरचेवर वादविवाद होत असल्याचे समजल्यानंतर प्रदिप सोनावणेवर अधिकच संशय वाढला. परंतु प्रदिप सोनावणे कोणाच्याही संपर्कात नसल्याने त्याचे बाबत काहीही माहिती मिळून आली नाही. म्हणुन सर्व नातेवाईक व मित्र परिवार यांचेशी सुसंवाद ठेवून काही माहिती मिळाल्यास कळविण्याची विनंती करण्यात आली तसेच सतत त्यांचेशी संपर्क साधण्यात आला. दरम्यान मयताच्या एका नातेवाईकाला आरोपीत प्रदिप सोनावणे याने थ्ब्ठव्ज्ञ डमैम्छळम्त द्वारे ३ ते ४ सेकंदाकरीता व्हिडीओ कॉल केला असल्याचे व कॉलनंतर त्याने स्वंत:चे फेसबुक अकांऊट डिलीट केले असल्याचे नातेवाईकाने पोलीस पथकास सांगीतले.

सदर मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने तांत्रिक तपासाद्वारे आरोपीचा ठावठिकाणा/पत्ता मिळवण्याचा प्रयत्न केला पण मिळून आला नाही. परंतु आरोपीताचा फोटो प्राप्त करण्यास पथकास यश प्राप्त झाले. वरीलप्रमाणे तुटपुंज्या माहितीच्या आधारे पथकाने केलेल्या तांत्रिक तपासामध्ये आरोपी कल्याण परिसरात राहत असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानंतर कक्ष –१० च्या पथकाने सतत

रात्रंदिवस कल्याण परिसरांत आरोपीचा शोध सुरू केला असता तो रंगकाम ( पेन्टर ) चे काम करीत असल्याचे समजले. पथकाने कल्याण परिसरांतील खडकपाडा, चिकनघर, व्दारली, कोळसेवाडी, आधारवाडी या भागातील हार्डवेअरची दुकाने तसेच रंगाकाम काम करणारे इसम यांचेकडे वेशांतर करून ग्राहक बनून आरोपीताचा शोध घेतला असता तो कल्याण पुर्व येथील नांदीवली गावांत राहत असल्याची माहिती मिळाली. पथकाने स्वंत:ची ओळख लपवून सतत नांदीवली परिसरात आरोपीबाबत गोपनीय चौकशी करून त्याचा मोबाईल नंबर प्राप्त केला. आरोपीचे मोबाईल क्रमांक मरोळ अंधेरी येथील पत्यावर रजिस्टर असल्याने तसेच तो अनोळखी कॉल स्विकारत नसल्याने ाोध घेणे अवघड झाले होते. आरोपी हा मागील ७ व ार्षापासून स्वत:चे आस्तित्व लपवून फरार असल्याने पथकाने कोणताही धोका न पत्करता नांदीवली परिसरांत एका घरामध्ये कलरचे काम करायचे असे चित्र निर्माण करून नांदिवली भागात एक खोली भाडयाने घेण्यात आली. सदरचा परिसर ग्रामीण भाग असल्याने आरोपीला संशय येवू नये यासाठी पोलीस पथकाने पुरेपुर काळजी घेतली कोणताही धोका पत्कारला नाही. स्थानिक बातमीदार तयार करून संशयीत प्रदिप सोनावणे यांचे पर्यत रंग कामाचा संदेश पाठविला संशयीत प्रदिप सोनावणे यास रंगकामाचे बहाण्याने बोलावून शिताफीने पोलीस पथकाने ताब्यात घेतले.

नमदू आरोपीतांस कक्ष कार्यालयात आणून त्याचेकडे विचारपूस केली असता त्याने प्रथम उडवाउडवीची उत्तरे दिली. परंतू पोलीस पथकाने आरोपीताकडे सतत कौशल्यपुर्वक वेगवेगळया क्लुप्त्या वापरून चौकशी केली असता त्यानेच आजीचा खून केल्याचे नि पन्न झाले. आरोपीकडे अधिक तपास केला असता मयत आजीने आरोपीताचे दुसऱ्या प्रेमविवाहांस नकार दिला होता. तसेच आजी दुसऱ्या पत्नीस सतत आरोपीविरूध्द भडकवत असल्याने रागाचे भरात आरोपीने हाताने तिचा गळा दाबून खुन करून पळून गेला असल्याचे सांगितले. सदर आरोपीतास पुढील कायदेशिर कार्यवाहीसाठी पवई पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देऊन सदर जबरी चोरीसह खूनाचा गंभीर गुन्हा ०७ वर्षानी उघडकिस आणून सोबतच्या यादीतील पोलीस पथकाने प्रशंसापात्र कामगिरी केली आहे. याबाबत प्रेस नोट प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

नमुद गुन्हयातील आरोपीतांने गुन्हा केल्यानंतर कोणताही पुरावा मागे ठेवला नव्हता. तसेच नमुद गुन्हयाचा कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नव्हते. कोणतेही पुरावे, तांत्रिक पुरावे आणि इतर धागेदोरे यांचा अभाव असतांनाही कक्ष–१० येथील सोबतच्या यादीतील अधिकारी व अंमलदार यांनी सर्व मार्गानी अतिशय कौशल्याने, चिकाटीने व व्यवसायीक तपास करून तसेच तपासात सातत्य राखून अहोरात्र मेहनत घेतली आणि आरोपींना गजाआड करून सदर गंभीर गुन्हा ०७ वर्षानी उघडकिस आणला आहे.

## गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष–१०, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभारी पोलीस निरीक्षक | श्री. महेशकुमार नवलसिंग ठाकूर | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | गणेश शि. तोडकर | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | धनराज कि. चौधरी | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पो.ह.क्र.३१८९० | सुनिल विठठलराव शेटे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ह.क्र.३४१६६ | जगदीश एस. धारगळकर | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ना.क्र.९९०४५४ | रमेश द. नलावडे | प्रशस्तीपत्रक |

| ०३ | एम.एच.बी.कॉलनी पोलीस ठाणे, मुंबई परिमंडळ–११. | गु.र.क्र.७९८/२०२१ कलम ३०२,३९७,५०६(२),३४ भादंवी सह कलम ३,२५ शस्त्र अधिनियम |
|---|---|---|

**—: " बॅक रॉबरी सह खुन ":—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमुद गुन्हयात दिनांक २९/१२/२०२१ रोजी ३.२७ वा. चे सुमारास फिर्यादी काम करीत असलेल्या स्टेट बॅक ऑफ इंडीया शाखा दहिसर पश्चिम, मुंबई येथे दोन अनोळखी व्यक्तींनी बॅकेत प्रवेश करून बॅक कर्मचारी संदेश गोमाणे याचेवर पिस्तुलाने गोळी झाडुन त्यास गंभीर दुखापत करून, त्यास जीवे ठार मारून व बॅक स्टाफ वर पिस्तुल रोखून, पिस्तुलचा धाक दाखवून फिर्यादीसह इतर कर्मचारी यांच्या मनात दहशत निर्माण करून बॅकेतील कॅशियरचे केबिन मधील अंदाजे रु. २.७ लाख इतकी रोख रक्कम जबरीने चोरून नेली म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती सीमा हेमंत पटेल वय ५२ वर्षे |
| बळीत | :— | संदेश धाकू गोमाणे, वय २६ वर्षे, |
| चोरीस गेलेली मालमत्ता | :— | **रु.२.७ लाख इतकी रोख रक्कम** |
| हस्तगत मालमत्ता | | **एकुण हस्तगत रक्कम रुपये २,६४,६००/—** |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) धर्मेंद्र सुभाषचंद्र यादव वय २१ वर्षे,<br>२) विकास गुलाबधर यादव वय १९ वर्षे, .<br>आरोपी.क्र १ व २ अटक दिनांक ३०/१२/२०२१ रोजी |

**तपास कौशल्य :—** नमुद गुन्हयात दि. ३०/१२/२०२१ गुन्हयातील मयत संदेश धाकू गोमाणे यांच्या मृतदेहावर सर जे.जे. रुग्णालय, शवविच्छेदन केंद्र, भायखळा, मुंबई येथे शवविच्छेदन करण्यात आले असून त्याचा **FM44MC/KJS/1367/21, Dt 29/12/2021** असा आहे. मा. वैद्यकीय अधिकारी, शवविच्छेदन केंद्र यांचेकडून मृत्यूच्या कारणांचा अहवाल प्राप्त करण्यात आला असून सदर अहवालामध्ये मृत्यूचे कारण **Haemorrhage and shock due to firearm injury (Unnatural) samples kept for accessory examination Reports** असे नमूद केले आहे.

मा. शवविच्छेदन अधिकारी यांनी मयताच्या शवविच्छेदनादरम्यान पिस्तूलातुन फायर झालेली व मयत संदेश गोमाणे याचे शरीरात मिळुन आलेली बुलेट, मयताचे हॅड वॉश, नमूना चामडी, रक्तचा नमूना, व्हिसेरा, नेल क्लिपींग असे बॅलेस्टीक व जैविक नमूने सिलबंद स्थितीमध्ये रासायनिक (बॅलेस्टीक) विश्लेषणाकरीता न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कलीना, मुंबई येथे जमा करण्याकरीता प्रपत्रासह ताब्यात दिलेले आहेत.

दि. २९/१२/२०२१ रोजी मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग व मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ११, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली एम.एच.बी. कॉलनी पोलीस ठाणेचे वपोनि. यांच्या नेतृत्वामध्ये एम.एच.बी. कॉलनी पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार तसेच उत्तर प्रादेशिक विभागांतर्गत पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार यांच्या मार्फतीने पोलीस श्वॉन जेसी यांचे मार्फत आरोपीच्या निर्गमनाचा मार्ग आणि तेथील अनेक आस्थापनांच्या सि.सि.टि.व्ही. फुटेज तसेच गुप्त बातमीदाराच्या मदतीने पाहीजे आरोपीतांचा शोध घेण्याकामी पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे वेगवेगळे पथक रवाना करण्यात आले.

गुन्हयातील घटनास्थळ एस.बी.आय. बॅकेमधील सि.सि.टि.व्ही. फुटेज व गुन्हयातील दोन्ही आरोपी गुन्हा केल्यानंतर परत गेलेल्या मार्गावरील सि.सि.टि.व्ही. फुटेजची तपासणी करून नमूद सि.सि.टि.व्ही. फुटेज मधील आरोपीत इसमांच्या अंगकाठीचे व त्याप्रमाणे शारिरीक हालचाल करणारे संशयीत इसम १) धर्मेंद्र सुभाषचंद्र यादव यास पो.नि. विजय कांदळगावकर/कांदिवली पोलीस ठाणे, पोउनि. विजय धोत्रे/एम.एच. बी. कॉलनी पोलीस ठाणे व पोउनि. हिंडे/गोराई पोलीस ठाणे व पोलीस पथक यांनी त्याच बरोबर संशयीत इसम २) विकास गुलाबधर यादव यास स.पो.नि. तोतावार/दहिसर पोलीस ठाणे व पोलीस पथक यांनी सदर दोन्हीही इसमांस राहत असलेल्या दहिसर पुर्व परिसरातून पकडून अधिक सखोल चौकशीकरीता एम. एच.बी. कॉलनी पोलीस ठाणेस आणले. नमूद दोन्ही संशयीत इसमांकडे गुन्हयाच्या अनुषंगाने तपास केला असता त्यांचा नमूद गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने खालील नमूद आरोपी आज दि. ३०/१२/२०२१ रोजी ०२:२० वाजता सदर गुन्हयात अटक केली असून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचे तंतोतंत पालन करण्यात आले आहे.

# एम.एच.बी पोलीस ठाणे, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | सहायक पोलीस आयुक्त बोरीवली विभाग | श्रीमती. रेखा महेंद्र भवरे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. रवि आनंदराव सरदेसाई | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरिक्षक | श्री विजय वासुदेव कांदळगावकर | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | विक्रांत शंकर शिरसट | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | ओम सुरेशराव तोटावर | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | अभिनव धोडींराम पवार | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | जिनपाल वाघमारे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पोलीस उप निरिक्षक | विजय रंगराव धोत्रे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पोलीस उप निरिक्षक | रमेश सूदाम वाघचौरे | प्रशस्तीपत्रक |
| १० | पोलीस उप निरिक्षक | निलेश अशोक मोरे | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पोलीस उप निरिक्षक | दिपक आनंदा हींडे | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पोलीस उप निरिक्षक | सागर विलास भोकरे | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पोलीस उप निरिक्षक | विशाल बाबुराव राऊत | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ह.क्र.९९०३२० | प्रविण दामोदर जोपळे | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह.क्र.६०३२२ | नंदकिशोर लवू तावडे | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ह.क्र.९६१३९१ | अनिल राम शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| १७ | म.पो.ह.क्र.१९.१०५८ | सुरेखा भानुदास लोंढे | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ह.क्र.३१९३५ | चद्रकांत सर्जेराव महागंडे | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ना.क्र.०१८५ | रेवनाथ सुर्यकांत गोसावी | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.शि.क्र.११.१५१८ | महातेंश मल्लीनाथ सवळी | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.शि.क्र.०५.०५६४ | सदिप आनंदराव परीट | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.शि.क्र.११.३३५५ | रजनीकांत सुरेश गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.शि.क्र.११.३२०९ | विक्रम शिवाजी बाबर | प्रशस्तीपत्रक |

**मजकुर :—**

दिनांक ०१/०२/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या ‘‘ **BEST CONVICTION OF THE MONTH "** माहे डिसेंबर २०२१ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ डिसेंबर— २०२१

| ०१ | काळा चौकी पोलीस ठाणे, मुंबई परिमंडळ—०४ | गु.र.क्र. २१३/२०१५ कलम ३०२ भा.द.वि. सह ३७(१)(अ) सह १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा |
|---|---|---|

—: ‘‘ **खुन** ’’:—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयातील यातील आरोपी नामे प्रसाद उर्फ दिगंबर विनायक सांवत वय २६ वर्षे याने मयत नामे एकता अंकुश पवार, वय २२ वर्षे, हिला पारशी कॉलनी वाडीया बाग समोर काळाचौकी मुंबई येथे विवाहाची मागणी घातली असता मयत एकता हिने त्यास नकार दिला म्हणून नमुद आरोपीताने त्याच्याकडील धारदार हत्याराने गंभीर स्वरूपाचे मानेवर व पोटावर वार करून जीवे ठार मारल्याने म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. योगीराज अंकुश तळवडकर, वय २३ वर्षे, |
| बळीत | :— | कु. एकता अंकुश तळवडकर, वय २३ वर्षे, |
| निकाल दिनांक | :— | दि.२३.१२.२०२१ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | प्रसाद उर्फ दिगंबर विनायक सांवत वय ३२ वर्षे, दि. २८/०६/२०१५ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद आरोपीस कलम ३०२ भा.द.वि., अन्वये आजन्म कारावास व १० हजार दंड तसेच दंड न भरल्यांस १ वर्षे कठोर कारावासाची शिक्षा सुनावली आहे |

**तपास कौशल्य** :— नमुद गुन्हयातील तपासी पथकाने आरोपी अटक करून विहीत वेळेत तपास पुर्ण करून आरोपीताविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले

तसेच न्यायालयीन कामकाज पाहणारे अधिकारी व अंमलदार यांनी अथक परिश्रम घेऊन नमुद गुन्हयातील साक्षीदार/पंच, यांना मार्गदर्शन करूने मा. न्यायालयात योग्य प्रकारे पुरावे सादर केल्याने आरोपीतास मा. न्यायालयाने दोन्ही आरोपीस दोषी ठरवुन आजीवन (मरेपर्यंत) कारावास व रू. २००० दंड शिक्षा सुनावली आहे.तसेच दंड न भरल्यास ६ महिने सक्त मजुरीची शिक्षा सुनावली आहे.

काळा चौकी पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ. क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. आनंद दगडु मुळे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री. सुधाकर शिरसाट | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | सखाराम रामचंद्र बनकर | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक | योगेश सुर्यभान काळे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस उप निरीक्षक | विक्रांत बळीराम मोहिते | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पोलीस उप निरीक्षक | सतिश पांडुरंग कोटकर | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ह.क्र.३४२०६ | बाळासाहेब सिताराम माने | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.ह.क्र .९६०७०७ | दिलीप दिनकर धादवड | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | म.पो.ना.क्र.०४.१०९० | क्रान्ती सागर शिंत्रे | प्रशस्तीपत्रक |

| ०२ | शिवाजी नगर पोलीस ठाणे, मुंबई परिमंडळ—६ | गु.र.क्र. ५७२/२०१५कलम ३७७ भा.दं.वि. सह ४, १२ पोक्सो अधिनियम, २०१२, |
|---|---|---|

—: '' **अल्पवयीन मुलावर पाशवी अनैसर्गिक संभोग करून लैगिक अत्याचार** '':—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात दिनांक २७/११/२०१५ रोजी २०.०० वा. ते २०.३० वा. दरम्यान. फिर्यादी श्री स्टीफन मंजुर मैसी वय ४८ वर्षे, यांचा अल्पवयीन मुलगा जॉय स्टीफन मॅसी, वय १३ वर्षे, यास आरोपी फादर जॉन्सन लॉरेन्स, वय ५१ वर्षे, याने क्राईस्ट द किंग चर्च, शिवाजीनगर, येथे चर्चच्या ऑफिसमधे बंद करून पाशवी अनैसर्गिक संभोग केला. म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री स्टीफन मंजुर मॅसी, वय ४८ वर्षे, |
| बळीत | :— | जॉय स्टीफन मॅसी, वय १३ वर्षे, |
| निकाल दिनांक | :— | दि.२९.१२.२०२१ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | फादर जॉन्सन लॉरेन्स, वय ५१ वर्षे, दि. ०२/१२/२०१५ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद आरोपीस आजन्म कारावास व १० हजार रूपये दंड तसेच दंड न भरल्यांस ६ महिने वाढीव कारावास अशी शिक्षा सुनावली आहे. |

**तपास कौशल्य** :— नमुद गुन्हयात तपासी अधिकारी, यांनी आरोपीतांस अटक करून विहीत वेळेत तपास पुर्ण केला. आरोपीताविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. तसेच न्यायालयीन कामकाज पाहणारे अधिकारी व अंमलदार यांनी नमुद गुन्हयातील साक्षीदार यांना मा. न्यायालयात हजर करून अथक परिश्रम घेऊन न्यायालयात अटक आरोपीविरूध्द शिक्षा लागणे योग्य साक्षीदार यांना मार्गदर्शन केले व हजर केले. मा. न्यायालयात योग्य प्रकारे पुरावे सादर केल्याने आरोपीतास मा. न्यायालयाने १० वर्षे सश्रम कारावास व १० हजार दंड तसेच दंड न भरल्यांस वाढीव ६ महिने अधिक कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

शिवाजी नगर पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरिक्षक | श्री. किशोर विश्वनाथ गायके | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री.इक्बाल मोहमद शिकलगार | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | श्री. जतकर | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरिक्षक | अरूण मारूती महाडीक | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | स.फौ. २७८५९ | दिपक मधुकर गोठीवरेकर | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ना.क्र.९७०५३८ | बापुराव शिवलिंग उगलमुगले | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.शि.क्र.१४.०११५ | सचिन भास्कर कुरहे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.शि.क्र.१४.१२८९ | योगेश साहेबराव ताकोने | |

| ०३ | आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई परिमंडळ—०१ | गु.र.क्र. ०३/१६ कलम ३०२,३४ भा. द. वि., |
|---|---|---|

—: “ **खुन** ”:—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयातील फिर्यादीचे भाऊ नामे मंदा राजुमनी काळे वय ३० वर्षे यांस दि.०४/०१/२०१६ रोजी २२.३० वा च्या सुमारास काही अनोळखी तृतीयपंथीय आरोपीतांनी मिळुन जबर मारहाण करून त्यांचे पोटातील महत्वाचे अवयवास इच्छापुर्वक दुखापत केली म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. व्यकंटेश राजुमनी काळे वय ४२ वर्षे |
| बळीत | :— | मंदा राजुमनी काळे वय ३० वर्षे |
| निकाल दिनांक | :— | दि.२४.१२.२०२१ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | १) समीरा उर्फ सुमन विनय सिंग वय २८ वर्षे<br>२) पायल उर्फ लक्की सागर वय ३० वर्षे<br>दि. ०७/०१/२०१६ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद आरोपीस कलम ३०२,३४ भा.द.वि., अन्वये आजन्म कारावास व १० हजार दंड तसेच दंड न भरल्यांस १ वर्षे कठोर कारावासाची शिक्षा सुनावली आहे |

**तपास कौशल्य** :— नमुद गुन्हयातील तपासी पथकाने आरोपी घटनास्थाळावरून फरार झाले होते. घटनास्थाळावरील सी.सी.टि.व्ही फुटेज व बातमीदार यांचे मार्फतीने आरोपीतांचा शोध घेवुन त्यांना अटक करून विहीत वेळेत तपास पुर्ण करून आरोपीताविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले

तसेच न्यायालयीन कामकाज पाहणारे अधिकारी व अंमलदार यांनी अथक परिश्रम घेऊन नमुद गुन्हयातील साक्षीदार/पंच, पंच डॉक्टर यांना न्यायालयात अटक आरोपीविरूध्द शिक्षा लागणे योग्य साक्षीदार यांना मार्गदर्शन केले व हजर केले. मा. न्यायालयात योग्य प्रकारे पुरावे सादर केल्याने आरोपीतास मा. न्यायालयाने दोन्ही आरोपीस दोषी ठरवुन आजन्म कारावास व १० हजार दंड तसेच दंड न भरल्यांस १ वर्षे कठोर कारावासाची शिक्षा सुनावली आहे

आझाद मैदान पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस निरीक्षक | श्री हरीदास कुंभार | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस उप निरीक्षक | संतोष शांताराम चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | स.फौ.क्र.२५५७० | सुनिल शांताराम सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पो.शि.क्र. ०६.१७९८ | सचिन अशोक उबाले | प्रशस्तीपत्रक |

| ०४ | दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई परिमंडळ—१२ | गु.र.क्र.४९७/२०१४,कलम३०२,३२४,३२३,५०६(२),१४३, १४४,१४७,१४८,१४९,२०१ भा.दं.वि.सह ४,२७ भा.ह.का |
|---|---|---|

—: '' **गैरकायद्याची मंडळी जमवुन जीवे ठार मारणे** '':—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात दिंडोशी पोलीस ठाणे हद्दीतील बबन जाधव चाळ, खोतडोंगरी, टिपको हाईटस्च्या समोर, राणीसती रोड, मालाड पुर्व, मुंबई येथे यातील आरोपीतांनी साक्षीदार हितेश यशवंत त्रिवेदी, जयेश यशवंत त्रिवेदी व सौ. दया यशवंत त्रिवेदी यांना मारहाण करीत होते. आरोपी सोहेल त्यांच्या हातातील लोखंडी रॉडने हितेशला मारहाण करीत होता. यातील फिर्यादी श्री. राजेश दशरथ जाधव व त्यांचा भाऊ श्री. रमेश दशरथ जाधव हे भांडण सोडविण्यासाठी गेले होते. भांडण सोडविण्यासाठी मध्ये आला याचा मनात राग धरुन वर नमुद सर्व आरोपीतांनी सामाईक ईरादयाने गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादींचा भाऊ रमेश जाधव यास पकडुन त्याला खेचत आरोपी राहत असलेल्या वली मोहम्मद चाळीजवळ नेले व आरोपी युसुफवली व इम्रान यानी रमेश यास भिंतीजवळ दाबून धरले व युसुफवली याने ''जानेसे मारदे साले को।'' असे जोरात ओरडुन सांगितल्याने आरोपी सोहेल अन्सारीने त्याच्या हातातील तलवारीने रमेशच्या छातीवर, तोंडावर व उजव्या हातावर वार केले. तसेच आरोपी गुल्लुवली साजीदाने त्याच्या हातातील गुप्ती रमेशच्या पायाच्या मांडीत आरपार खुपसल्याने त्याचे मांडीत जखम होवून रक्तस्त्राव होवू लागला. जखमी रमेश यास सोडविण्यासाठी फिर्यादी राजेश जाधव हा पुढे जात असल्याने यास सर्व आरोपीतांनी हाताने मारहाण करुन रमेश जवळ जाण्यास प्रतिबंध केला. तसेच आरोपीतांनी मारहाण करुन रमेश जाधव यास जिवे ठार मारले. तसेच साक्षीदार हितेश त्रिवेदी, दया त्रिवेदी व दया त्रिवेदी यांना हत्याऱ्याने गंभीर दुखापत व साधी दुखापत करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच महिला आरोपी रुक्साना काझी हिने घटनास्थळावरील पडलेले रक्त पाण्याने धुवून कपडयाने सदर जागा साफ करुन पुरावा नष्ट केला. म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री राजेश दशरथ जाधव, वय २२ वर्षे, |
| बळीत | :— | रमेश दशरथ जाधव |
| निकाल दिनांक | :— | दि.२३.१२.२०२१ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | १) सोहेल सलीम अन्सारी, वय २७ वर्षे,<br>२) युसुफअली वली मोहम्मद साजीदा, वय ४७ वर्षे,<br>३) इम्रान अन्वर काझी, वय ३८ वर्षे,<br>४) गुल्लुवली मोहम्मद साजीदा, वय ४४ वर्षे<br>आरोपी.क्र.१ ते ४ अटक दिनांक २२/१०/२०१४ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद आरोपीस १) कलम ३०२ भादवि अन्वये जन्मठेप व रु. ७,०००/— दंड आणि दंड न भरल्यास १ वर्षे सक्त मजुरी.<br>२) कलम ३२४ भादवि अन्वये ३ वर्षे साधी कैद व रु. ३,०००/— दंड आणि दंड न भरल्यास ६ महिने सक्त मजुरी.<br>३)कलम ३२३ भादवि अन्वये १ वर्षे साधी कैद व रु. १,०००/— दंड आणि दंड न भरल्यास ३ महिने सक्त मजुरी.<br>४) कलम ५०६(२) भादवि अन्वये २ वर्षे साधी कैद व रु. २,०००/— दंड आणि दंड न भरल्यास ४ महिने सक्त मजुरी.<br>५) कलम १४३ भादवि अन्वये ६ महिने साधी कैद व रु. १,०००/— दंड आणि दंड न भरल्यास ३ महिने सक्त मजुरी.<br>६) कलम १४४ भादवि अन्वये २ वर्षे साधी कैद व रु. २,०००/— दंड आणि दंड न भरल्यास ४ महिने सक्त मजुरी.<br>७) कलम १४७ भादवि अन्वये २ वर्षे साधी कैद व रु. २,०००/— दंड आणि दंड न भरल्यास ४ महिने सक्त मजुरी.<br>८) कलम १४८ भादवि अन्वये ३ वर्षे साधी कैद व रु. ३,०००/— दंड आणि दंड न भरल्यास ६ महिने सक्त मजुरी |

**तपास कौशल्य** :— नमुद गुन्हयात तपासी अधिकारी यांनी गुन्हयाचा परिपुर्ण तपास करुन

आरोपींताविरुध्द सबळ पुरावा गोळा करुन मा. सत्रन्यायालय, कोर्ट क्र. १०, दिंडोशी, मुंबई यांचे न्यायालयात सेशन केस क्रमांक ४४/२०१५ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

तत्कालीन तपासी अधिकारी न्यायालयीन कामकाज पाहणारे अधिकारी व अंमलदार यांनी यातील फिर्यादी, साक्षीदार, पंच यांना वेळोवेळी मार्गदर्शन करुन मा. न्यायालयात साक्षीकरीता वेळेवर हजर ठेवले. त्याचप्रमाणे गुन्हयातील आरोपीतांविरुध्दचे पुरावे सक्षमपणे मा. न्यायालयासमोर मांडण्यास मदत केली. त्यामुळे सदर गुन्हयात मा. सेशन जज्ज श्री. एल.एस. चव्हाण, अति. सत्र न्यायाधिश, कोर्ट रूम नंबर १०, दिंडोशी, मुंबई यांनी अटक आरोपीतांना शिक्षा सुनावली आहे.

दिंडोशी पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस निरीक्षक | श्री अर्जुन रामकृष्ण रजाने | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री धरणेंद्र श्रीपाल कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | श्री. राजीव शिवाजीराव चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक | सदानंद गंगाराम सावरकर | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस उप निरीक्षक | अनिल भालचंद्र मेढेकर, | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | स.फौ.क्र. १३५३५, | प्रल्हाद मोहन घाडीगांवकर | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ह.क्र. २९७९४, | संजय लक्ष्मण निळगुणकर | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.ह.क्र. ३१३९९ | गोरक्षनाथ ज्ञानदेव लाड | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.ना.क्र. ९८०२०३, | प्रकाश नामदेव तांबे, | प्रशस्तीपत्रक |
| १० | म.पो.शि. ०८.१४३८ | शोभा सतिश झोडगे, | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.शि.क्र. ०९.०६१२ | अतुल दिलीप माने | प्रशस्तीपत्रक |

**टिप:— वरिष्ठ /प्रभारी पोलीस निरीक्षक, गु.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष—०३, व १०, एम.एच.बी. नगर पोलीस ठाणे व काळा चौकी पोलीस ठाणे, शिवाजी नगर पोलीस ठाणे आणि आझाद मैदान पोलीस ठाणे, दिंडोशी पोलीस ठाणे यांना कळविण्यात येते की,** Best Detection of the Month December– 2021 **व** Best Conviction of the December -- 2021 **या करीता निवड झालेनंतर राज्य स्तरावर गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न** (Best Detection of Month) **करीता प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म. रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र 'क' प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.**

# Best Detection of the Month

## ‘प्रपत्र ‘ क ’

| अ. क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | **Property offence** बाबतीत<br>**a)** गेलेला माल<br>**b)** जप्त/हस्तगत केलेला मालं | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे<br>**a)** घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | **Inquest** पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | **DNA** टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | **CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence** बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | **Cyber Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | **FORENSIC Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | **Dog Squad** ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | **Fingerprint / Handwriting Expert** ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी **Portrait** बाबत **Expert** ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळख कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) **FIR** प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब,शवविच्छेदन अहवाल, आळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, Inquest पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणा साठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा.सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Conviction of the Month

## ‘प्रपत्र ‘ क ’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०५ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०६ | गुन्हयाचा निकाल दिनांक | |
| ०७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | फरार आरोपी अटक, सी.आर.पी.सी., कलम ८२,८३ नुसार कार्यवाही केली आहे का ? | |
| १० | प्रत्येक आरोपीला झालेली शिक्षा | |
| ११ | न्यायालयाने ज्या पुरावा साखळीचे आधारे शिखा दिली त्याबाबतची सविस्तर माहिती.<br>**A)** साक्षीदारांचे न्यायालयासमोर जबाब<br>**B)**पंचांचें न्यायालयासमोर जबाब<br>**C)** परिस्थितीजन्य पुरावा साखळी<br>**D)** तज्ञ व्यक्तीचे जबाब<br>**E)** वैज्ञानिक /तांत्रिक पुरावे<br>**F)** तपासी अंमलदार यांचे जबाब<br>**G)** पैरवी अधिकारी नाव व कामगिरी<br>**H)** सरकारी वकील नाव व कामगिरी | |
| १२ | तपास व अपराधसिध्दी करीता यांगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) मा.न्यायालयाचे निकालपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

२) गुन्हयाचे निकाल ज्या महिन्यामध्ये देण्यात आललो आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट अपराधसिध्दी बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव निकाल लागलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे

# INTEGRITY CERTIFICATE

Certified that the integrity of Mr/Mrs …………………………………, Designation-…………………., Recommended for the award of **" Excellence in Investigation"** for the Month of ……..Year 2021 is above suspicion and that he / she was not concerned in any proceeding that was censured in a court of law. It is further certified that no judicial or departmental proceeding are being contemplated/pending against him / her similarly no vigilance case is being contemplated/pending against him/her. It is also certified that recommendee has not been given any Major Penalty/Minor penalty in the last Five year.

2. It is also certified that the character and antecedents (of the proposed awardee) have been duly verified and nothing adverse reported against him/her.

**Name:-**
Desiganation:- Addl. Commissioner of Police
…………. Mumbai
Contact No :- 022-
Date :- / /2022